**ठळक बातम्या**

- सर्वोच्च न्यायालयाच्या ५ नवीन न्यायाधीशांचा शपथविधी संपन्न
- शिक्षण हे सक्षमीकरणाचं प्रभावी माध्यम असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांकडून पैसे परत घेणार नाही असं मुख्यमंत्र्यांचं स्पष्टीकरण
- इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधूचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

**आणि**

- मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर संचालनालयाच्या कारवाईत अडीच किलोपेक्षा जास्त तस्करीचं सोनं जप्त

**<><><><><>**

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी आज सर्वोच्च न्यायालयाच्या पाच नवीन न्यायाधीशांना पदाची शपथ दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने केलेल्या शिफारशीनुसार केंद्र सरकारने न्यायाधीशांच्या नियुक्त्यांना नियुक्त्यांना मंजुरी दिली होती. त्यानुसार, न्यायमूर्ती शील नागू, श्री चंद्रशेखर, संजीव सचदेव आणि अरुण पल्ली यांनी, ज्येष्ठ वकील व्ही. मोहना यांच्यासह सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. भारताच्या सरन्यायाधीशांबरोबर सल्लामसलत केल्यावर, राष्ट्रपतींनी या नियुक्त्यांना मंजुरी दिल्याचं केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी समाज माध्यमावर जाहीर केलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 'सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा अध्यादेश, २०२६' जारी केल्यानंतर ही नियुक्ती झाली. या अध्यादेशाद्वारे सर्वोच्च न्यायालयातल्या न्यायाधीशांची मंजूर संख्या ३४ वरून ३८ पर्यंत वाढवण्यात आली असून, यात भारताच्या सरन्यायाधीशांचाही समावेश आहे.

**<><><><><>**

शिक्षण माणसाला जागरूक आणि स्वावलंबी बनवतं त्यामुळे ते सक्षमीकरणाचं प्रभावी माध्यम आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं  आहे. त्या आज नवी दिल्लीत शिष्यवृत्ती योजनेच्या आदिवासी समुदायातल्या लाभार्थ्यांशी बोलत होत्या. समाजातल्या सर्व घटकांची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रगती होते तेव्हाच खरा विकास होतो, असं त्या म्हणाल्या. शिष्यवृत्ती योजनांमुळे आदिवासी समुदायातल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळते, यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या.

**होल्ड बाईट राष्ट्रपती (३२ सेकंद)**

**<><><><><>**

भारताच्या 'शेजारी प्रथम', 'ॲक्ट ईस्ट' आणि 'महासागर' या धोरणांमध्ये म्यानमां हा एक महत्त्वाचा भागीदार असल्याचं राष्ट्रापती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. म्यानमारचे अध्यक्ष  यू मिन आँग लाइंग यांच्याशी  काल राष्ट्रपती भवनात बोलत होत्या. म्यानमारच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रं स्वीकारल्याबद्दल ह्लाइंग यांचं त्यांनी अभिनंदन केलं. म्यानमाचे राष्ट्राध्यक्ष  उच्चस्तरीय शिष्टमंडळासह सध्या भारत दौऱ्यावर असून काही वेळापूर्वी त्यांचं मुंबईत आगमन झालं. राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. या भेटीत म्यानमांचे अध्यक्ष व्यवसाय आणि उद्योग क्षेत्रातल्या मान्यवराच्या भेटीगाठी घेणार आहेत.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिकेने द्विपक्षीय व्यापार कराराच्या बहुतांश बाबी निश्चित केल्या आहेत. कराराच्या पहिल्या टप्प्याला अंतिम स्वरुप देण्यासाठी नवी दिल्लीत आज आणि उद्या अमेरिकन शिष्टमंडळाबरोबर  चर्चा होत असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी सांगितलं. वाणिज्य विभागातले अतिरिक्त सचिव

दर्पण जैन भारताची भूमिका मांडत आहेत, तर अमेरिकेच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व ब्रेंडन लिंच करत आहेत. गेल्या 3 फेब्रुवारी रोजी, दोन्ही बाजूंनी याकराराच्या पहिल्या टप्प्याची रूपरेषा जाहीर केली होती.

**<><><><><>**

सीबीएसई, अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने उपलब्ध केलेल्या उत्तरपत्रिकांच्या ‘स्कॅन्ड’ (scanned) प्रतींमधल्या त्रुटींच्या पडताळणीसाठी, तसंच उत्तरांच्या पुनर्मुल्यांकनासाठीचं पोर्टल आजपासून कार्यान्वित झाल्याचं सीबीएसई नं जाहीर केलं आहे.  हे पोर्टल येत्या ६ जून पर्यंत खुलं राहील, तसंच केवळ ज्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकांची स्कॅन केलेली प्रत मिळवली आहे, त्यांनाच  या सुविधेचा  लाभ घेता येईल, असं सीबीएसई नं आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. सुरक्षेच्या कारणासाठी यामध्ये आधार पडताळणीचा समावेश करण्यात आला असून, ज्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाही, त्यांना आपले पालक अथवा नातेवाईकांचे आधार तपशील वापरता  येतील. गुणपडताळणी आणि पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज कसा करावा, याविषयीच्या सूचना समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी ट्युटोरियल व्हिडिओ काळजीपूर्वक पहावा, असं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

इबोला विषाणूसंसर्गाचा एकही रुग्ण आतापर्यंत देशात सापडलेला नाही असं केंद्रीय आरोग्य खात्याने स्पष्ट केलं आहे. गेल्या २१दिवसात इबोलाचा प्रादुर्भाव झालेल्या देशातून आलेल्या प्रवाशांना जर ताप, डोकेदुखी, अंगदुखी, जुलाब, विनाकारण रक्तस्त्राव अशी लक्षणं आढळली तर त्यांनी विलगीकरणात जावं, आणि ताबडतोब स्थानिक आरोग्य प्रशासनाला त्याची माहिती द्यावी असं आवाहन मंत्रालयाने केलं आहे. इबोला संसर्गाबाबत काहीही माहिती किंवा मदत हवी असेल तर १०७५ या मदत क्रमांकावर संपर्क साधावा, रोगाचा प्रसार रोखण्यासाठी वेळेवर माहिती मिळणं अत्यावश्यक आहे, असं मंत्रालयाने म्हटलं आहे. दरम्यान,

इबोलाग्रस्त आफ्रिकन देशात रोगप्रसाराला आळा घालण्यासाठी भारताने वैद्यकीय मदत पथकाची दुसरी तुकडी रवाना केली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी  समाजमाध्यमावर ही माहिती दिली. ४३ टन मदत साहित्य घेऊन गे जहाज आज रवाना झालं.

**<><><><>**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून वगळले गेलेल्या लाभार्थी कागदपत्रं सादर करू शकल्या नाहीत, संपूर्ण छाननी केल्यानंतरच त्यांना अपात्र ठरवलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. लाडकी बहीण योजनेची सुरुवात झाली तेव्हा कागदपत्रं सादर करायला उशीर लागेल म्हणून लाभार्थ्यांनी स्वतः दिलेली माहिती गृहित धरून लाभ दिला गेला होता. मात्र त्यानंतर या योजनेचं ऑडिट झाल्यावर लाभार्थ्यांपैकी पाच लाख जणींच्या कुटुंबात सरकारी नोकरी असल्याचं उघड झालं, तसंच दहा लाख जणींचं उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त असल्याचं समोर आलं, त्यामुळे त्या सर्व लाभार्थी अपात्र ठरल्या. तसंच १४ हजार पुरुषांनी या योजनेसाठी अर्ज केले होते त्यांनाही अपात्र ठरवण्यात आलं, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना केवायसी करायला सांगण्यात आलं, ज्यांनी केवायसी केलं अशा एक कोटी ७० लाख महिला योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत, बाकी सर्व अपात्र ठरल्या असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. जे लाभार्थी अपात्र ठरले त्यांना आता पैसे दिले जाणार नाहीत, मात्र आतापर्यंत मिळालेले पैसे परत घेतले जाणार नाहीत असंही त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री (२१ सेकंद)**

शेतकरी कर्जमाफीविषयी विचारलं असता आजच्या  मंत्रिमंडळाच्या याबाबत बैठकीत निर्णय होईल, मात्र निवडणुकीमुळे काय निर्णय झाला याची अधिकृत घोषणा करता येणार नाही, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><>

सक्तवसुली संचालनालयानं आज अंमली पदार्थ तस्कर मोहम्मद सलीम डोला याच्याविरुद्धच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये विविध ठिकाणी छापे टाकले. मुंबई, सूरत आणि अंकलेश्वरमध्ये साधारण २० ठिकाणी ईडीनं ही कारवाई केली. रसायनांचे पुरवठेदार, असा व्यवहारांमधले मध्यस्थ, मेफेड्रोन या अंमली पदार्थाची निर्मिती आणि वितरण करणआरे तस्कर, हवाला ऑपरेटर्स आणि अंमली पदार्थांच्या तस्करीतून मिळालेल्या पैशातून बेनामी मालमत्ता बाळगणाऱ्या व्यक्तींशी संबंधित ठिकाणी ही कारवाई सुरू आहे. सलीम डोला हा दहशतवादी दाऊद इब्राहिमचा निकटवर्तीय असून काहीच दिवसांपूर्वी त्याला तुर्किएतून भारतात आणलं होतं.

<><><><>

महसूल गुप्तचर संचालनालयाने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून परदेशातून तस्करी केलेलं अडीच किलोपेक्षा जास्त सोनं जप्त केलं. मेणाच्या स्वरूपातल्या या सोन्याची किंमत ४ कोटीपेक्षा जास्त आहे. विशिष्ट माहितीच्या आधारे दुबईहून भारतात आलेल्या दोन तस्करांकडून जप्त केलेलं हे सोनं २४ कॅरेटचं आहे. या तपासादरम्यान, हे सोनं तस्करी करून भारतात आणायच्या कटात सामील असलेल्या नवी मुंबईतल्या एका सोनारालाही पोलिसांनी ताब्यात घेतलं.

<><><><>

गृहमंत्रालयाने ‘स्थलांतर आणि परदेशी  नागरिक (सुधारणा) नियम २०२६’ ची अधिसूचना जारी केली आहे. या  दुरुस्तीमुळे परदेशी नागरिकांना भारतात आगमन झाल्यावर १८० दिवसांच्या आत आपली नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.  यापूर्वी १८० दिवसांचा कालावधी संपल्यावर १४ दिवसांच्या आत नोंदणी

प्रक्रिया पूर्ण करण्याची परवानगी होती. नव्या नियमानुसार आता केवळ आपत्कालीन परिस्थितीत मुदत संपल्यावर नोंदणीची परवानगी मिळेल.

**<><><><><>**

येत्या ४ ते ८ जून दरम्यान अहमदाबाद इथं आयोजित पहिल्या जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अमेरिकेतल्या योग-पटूंचं पथक भारतात येत आहे. ‘युनायटेड स्टेट्स योग  असोसिएशन’ आणि ‘वर्ल्ड योगासन’ यांच्या सहयोगानं, युनायटेड स्टेट्स योगासन स्पोर्ट्स फेडरेशननं  या स्पर्धेसाठी अमेरिकेच्या अधिकृत पथकाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमामुळे ६०  पेक्षा जास्त देशांचे खेळाडू, आणि प्रतिनिधी एकत्र येतील अशी अपेक्षा असून, यामुळे 'योगासन' हा जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त स्पर्धात्मक खेळ म्हणून पुढे येईल, तसंच आंतरराष्ट्रीय एकता, स्वास्थ्य आणि सांस्कृतिक देवाणघेवाण याला  चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**<><><><><>**

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी.व्ही सिंधूने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. थायलंडच्या बुसानान ओंबांरुंहफानला तिनं आज २५-२३,२१-१६ असं पराभूत केलं. मालविका बनसोडला मात्र पहिल्याच फेरीत थायलंडच्या पोर्नपावी चोचुवांग कडून पराभव पत्करावा लागला. पुरुषांच्या गटात किदंबी श्रीकांतही पहिल्याच फेरीत पराभूत झाला. लक्ष्य सेनचा सामना आज दुपारी होईल. ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद ही महिला दुहेरीची जोडी, तसंच मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांचे सामने देखील आज होणार आहेत.

**//<><><><><>//**